<u>नि. फौ. ख. क्र.१३०/२०१८</u> निशाणी क्र.४१

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – नागेश सुखराम तेलगोटे

वय – ४५ वर्षे व्यवसाय – तहसिलमध्ये दस्तलेखक

पत्ता – रा. नवानगर, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचे मार्फत सरतपास दुपारी १२.४१ वा. सुरुः</u>**

१. मी सर्व आरोपींना ओळखतो ते आमच्या मोहल्यामध्ये राहतात. ते सर्वजण आज रोजी न्यायालयात हजर आहेत. फिर्यादी सुखराम तेलगोटे हे माझे वडील आहेत. घटना दि.०१.०७.२०१८ रोजी रविवारी सकाळी १०. ते १०.३० च्या दरम्यान घडलेली आहे. आरोपींच्या नवानगर येथील घरासमोर माझ्या नावाने जागा आहे. आरोपींनी माझ्या नावाने त्यांच्या घरासमोर असलेल्या जागेवर बेकायदेशिरपणे कच्चे बांधकाम केलेले होते, त्यामुळे वडील सुखराम तेलगोटे हे आरोपींना जाब विचारण्याकरीता गेले असता, आरोपींनी माझ्या वडीलांना मारहाण सुरु केली. अमोल हिवराळे याने माझ्या वडीलांना लाकडी दांड्याने डाव्या पायावर मारल्यामुळे वडीलांचा पाय फ्रॅक्चर झाला होता. दिलीप हिवराळे यांनी माझ्या वडीलांना चाकू मारल्यामुळे डाव्या कानाला जखम झाली होती. मी आणि माझा भाऊ दिनेश तेलगोटे घटनास्थळी गेलो असता घटनास्थळ रोडवर माझे वडील पडलेले होते. तेथे गेलो असता मी तेथे पोलीसांना बोलाविले. त्यानंतर पोलीसांनी माझ्या वडीलांना अकोला येथील सरकारी दवाखान्यामध्ये नेले. त्यानंतर अकोला येथील डॉ. आशुतोष डाबरे यांच्याकडे उपचार घेण्यात आले होते. घटना घडली त्या दिवशी रविवार असल्यामुळे मी घरी होतो. घटनेच्यावेळी आरोपी आणि त्यांचे नातेवाईक घटनास्थळी होते.

२. पोलीसांनी घटनेविषयी माझ्याकडे चौकशी करुन माझे बयाण माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदवून घेतले होते.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. वानखडे यांचे मार्फतः–</u>**

३. तहसिल कार्यालयामध्ये दस्तलेखक म्हणून सन २००८ पासून मी काम करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, तहसिलमध्ये दस्तलेखक म्हणून काम करण्यासाठी माझ्या वैयक्तिक नावाचा परवाना माझ्याकडे उपलब्ध नाही. स्वतःहून सांगतो की, वडीलांच्या नावे परवाना उपलब्ध आहे. हे म्हणणे खरे आहे की, तहसिल कार्यालयामध्ये येणाऱ्या नागरिकांच्या तक्रारी तसेच दस्त अशा विविध स्वरुपाच्या दस्तांचे लिखाण करण्याचे काम करतो.

४. माझ्या नावाने आरोपींच्या घरासमोर जागा आहे, ही बाब मी पोलीसांना माझे बयाण नोंदवितेवेळी कथन केले होते, परंतु सदर बाब माझ्या बयाणामध्ये का नमुद केलेली नाही याचे कारण मला सांगता येत नाही. सदर प्रकरणामध्ये जागा माझे नावे असल्याबाबतचा दस्त पोलीसांना दिला होता, परंतु तसा दस्त आज रोजी न्यायालयाच्या अभिलेखामध्ये का दाखल नाही, याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला सदर घटनेविषयी कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या सांगण्यावरुन आज रोजी मी खोटी साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, जी जागा मी माझी आहे असे सांगत आहे, ती जागा आरोपींच्या ताब्यात असून ती हडपण्याकरीता खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास दुपारी १२.५८ वा. पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १४.०२.२०२५**

**समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

VISHNU DATTARAO GITE
Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2025.02.14 16:03:42 +0530

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>बाळापूर |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | १४/०२/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १४/०२/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १४/०२/२०२५ |